# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## एम. ए. मराठी, (भाग १)

### मे २०१० परीक्षा

**विषय : प्राचीन गद्य-पद्य (M-102)**

| दिनांक : १९/५/२०१० | गुण : १०० | वेळ : स. १०.०० ते दु. १.०० |
|---|---|---|

**सुचना** : १. सर्व प्रश्न सोडवा.
२. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

**प्रश्न १. अ)** 'लीळाचरित्र-एकाक' ची वाङ्.मयीन वैशिष्ट्ये साधार लिहा. **(२०)**

**किंवा**

**ब)** महानुभव संप्रदायाच्या तत्त्वांचे दर्शन 'लीळाचरित्र-एकाक' मधून कसे घडते, ते सोदाहरण सांगा.

**प्रश्न २. अ)** संत कवयित्रींच्या काव्यातून विठ्ठलाचे दर्शन कसे घडते ते स्पष्ट करा. **(२०)**

**किंवा**

**ब)** संत कवयित्रींच्या काव्यातून कोणकोणते वाङ्.मयीन गुण अभिव्यक्त होतात, ते विवेचनपूर्वक लिहा.

**प्रश्न ३. अ)** 'विराटपर्व' च्या आधारे पंडिती काव्याचे विशेष स्पष्ट करा. **(२०)**

**किंवा**

**अ)** श्लोक 'केकावली' मधून कवीची परमेश्वरभेटीची तळमळ कशी व्यक्त झाली आहे ते सोदाहरण लिहा.

**किंवा**

**ब)** 'आज्ञापत्रा'ची वाङ्.मयीन वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**प्रश्न ४. संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. (कोणतीही दोन)** **(२०)**

१) सुसंगति सदा घडो सुजनवाक्य कानी पडो
कलंक मतिचा झडो विषय सर्वदा नावडो

२) राज्ञी म्हणे, पहाया रुप असे, ईश्वरीय नवसावे
कोण सचक्षू म्हणेल स्वगृही तुज सुंदरीस न वसावे?

३) राजे लोकांस विनोदाचे व्यसन एकंदर नसावे

४) भूमि इनाम करुन देणे हा परमअन्याय

५) डोईचा पदर आला खांद्यावरी । भरल्या बाजारी जाईन मी।

**प्रश्न ५. टीपा लिहा. (कोणत्याही दोन)** **(२०)**

१) 'विराटपर्व ' मधील कीचकवधाचा प्रसंग किंवा 'केकावली' चे अलंकार सौंदर्य.

२) शिवाजीमहाराजांची राज्यकारभार पध्दती

३) ' आज्ञापत्रा' चा काळ आणि कर्ता.

४) जनाबाईचे अभंग

---